Press Information Bureau
Government of India
****

Ek Bharat Shreshtha Bharat

Article on Bhitarkanika National Park of Odisha which was published in Marathi publications across the paired state of Maharashtra in September, 2020.

निसर्गावर अतोनात प्रेम असणाऱ्या व्यक्ती सर्वसामान्य पर्यटकांपेक्षा निश्चितच वेगळ्या असतात. त्यांना जंगल आवडते, त्यांना वन्यजीव आवडतात आणि त्यांना वातावरणातला निर्मळपणा आवडतो. वन्य प्राण्यांमुळे संकटात सापडण्याचा धोकादेखील त्यांना जंगलांमध्ये जाण्यापासून रोखत नाही. पर्यटकांनी गजबजलेली प्रसिद्ध राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्ये म्हणजे याचे उत्तम उदाहरण होय. मात्र काही पर्यटक असेही आहेत ज्यांना फारशा ज्ञात नसलेल्या राष्ट्रीय उद्यानांचा आणि अभयारण्यांचा धांडोळा घेणे आवडते. अशा निसर्गप्रेमींना ओदिशामध्ये एका अनोख्या उद्यानाला भेट देता येईल.

भितरकनिका राष्ट्रीय उद्यान

ओदिशाच्या इशान्येकडील केंद्रपारा जिल्ह्यातील ब्राह्मणी-बैतरणी भागात वसलेले, हे भितरकनिका राष्ट्रीय उद्यान म्हणजे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे खारफुटी क्षेत्र आहे. जैवविविधतेने समृद्ध असे हे एक वैशिष्ट्यपूर्ण क्षेत्र आहे. या भागात लहान भूखंड, त्रिभुज प्रदेशातील भरतीमुळे निर्माण झालेल्या जलरचना, नद्यांचे उगम आणि बंगालच्या उपसागराच्या पाण्यासोबतच विविध वनस्पती आणि प्राण्यांचा समावेश आहे. १४५ चौरस किलो मीटर लांबीचे हे विशाल असे राष्ट्रीय उद्यान आहे. त्याची रचना १६ सप्टेंबर १९९८ ला करण्यात आली आणि ऑगस्ट २०२० मध्ये या राष्ट्रीय उद्यानाला रामसर स्थळाचा दर्जा मिळाला. चिल्का सरोवरानंतरचे हे राज्यातील दुसरे रामसर स्थळ आहे. ते भितरकनिका वन्यजीव अभयारण्याने वेढलेले असून २१ एप्रिल १९७५ ला यास अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले. या अभयारण्याने ६७२ चौरस किमी क्षेत्र व्यापले आहे. राष्ट्रीय उद्यान आणि वन्यजीव अभयारण्याचा परिसर ब्राह्मणी, बैतरणी, धमरा, पथसाला नद्यांनी व्यापलेला आहे.

समृद्ध असा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा असणारे भितरकनिका हे पूर्वीच्या कनिक राजाचे शिकार करण्याचे ठिकाण होते. भितरकनिकाच्या रस्त्यांवर आणि डांगमल येथे अनेक ठिकाणी शिकारीसाठीचे मनोरे आणि कृत्रिम पाण्याचे टाके आजही दिसून येतात. मध्ययुगीन काळातील हिंदू मंदिरे देखील या अभयारण्यात सापडतात. मात्र येथील वन्यजीव हे या अभयारण्याचे मुख्य आकर्षण आहे.

या अभयारण्यात खारफुटी प्रजाती, खडशेरणी अर्थात कॅश्युरिना आणि इंडिगो बुश सारखे गवताचे प्रकार आढळतात तर उद्यानात खाऱ्या पाण्यातील मगरी, भारतीय अजगर, काळे आयबिस, रानडुक्कर, व्हीसस वानर, चितळे, पाणबुडे पक्षी, कोब्रा तसेच मोठे सरडे आढळतात. गहिरमाथा आणि इतर नजिकच्या किनाऱ्यांवर ऑलिव्ह रिडले कासव घरटी करतात. भारतात झपाट्याने कमी होणाऱ्या खाऱ्या पाण्यातील मगरी भितरकनिका येथे सर्वात जास्त संख्येने आहेत आणि त्यांचे जागतिक स्तरावरील वैशिष्ट्य म्हणजे पूर्ण वाढ झालेल्या १० टक्के मगरी सहा मीटरपेक्षा जास्त लांब आहेत.

रश्मी सोनिया तिरके

सस्तन प्राण्यांसंदर्भातील एका सर्वेक्षणानुसार, या वनात सुमारे १,९०० चितळांनी आणि १,२०० रानडुक्करांनी कायमचे वास्तव्य केले आहे. इतर सस्तन प्राण्यांमध्ये वानर, जॅकल, साधे लंगूर, पाणमांजर, सांबर, रानमांजरी, कोल्हे, मुंगूसे, लांडगे, तरसे इत्यादींचा समावेश आहे.

एशियन ओपन बिल, कॉर्मोरंट्स, डार्टर्स, ब्लॅक आयबिस, इग्रेट्स असे पक्षी उद्यानात वरचेवर दिसतात. पक्ष्यांच्या २१५ पेक्षा जास्त प्रजातींचे हे माहेरघर आहे. अनुकुल तसेच निर्मळ, प्रदूषणमुक्त वातावरणामुळे हिवाळ्यात युरोप आणि मध्य-आशियातून स्थलांतरित होणाऱ्या पक्ष्यांचीही येथे रेलचेल असते. लडाख, मानसरोवर, हिमालय, सायबेरिया, कझाकस्थान, मंगोलिया, रशिया, अफगाणिस्तान, इराक, उत्तर आशिया आणि काही मध्य युरोपियन देशांमधील कडाक्याच्या थंडीपासून बचाव करण्यासाठी हजारो मैलांचे स्थलांतर करून पक्षी भितरकनिकामध्ये येतात. किंगफिशर पक्षाच्या किमान आठ वेगवेगळ्या जाती सुद्धा येथे दिसून येतात.

भितरकनिका राष्ट्रीय उद्यानाच्या अगदी जवळ ओदिशामधील एकमेव कासव अभयारण्य आहे. गहिरमाथा समुद्राचा एक भाग असणाऱ्या या कासव अभयारण्यात ऑलिव्ह रिडले प्रजातीचे कासवे आढळतात. होडीमध्ये बसून नदीतून हळू हळू विशाल समुद्राच्या दिशेने प्रवास करणे, हा एक थरारक आणि रोमांचक अनुभव आहे. ही कासवे प्रजननासाठी दक्षिण प्रशांत महासागरापासून गहिरमाथा किनाऱ्यापर्यंतचा प्रदीर्घ प्रवास करतात. अशी सुमारे १५ लाख कासवे प्रजोत्पादनासाठी समुद्रकिनाऱ्यावर येऊन धडकतात. ऑलिव्ह रिडले कासवांच्या घरट्यांसाठी प्रसिद्ध असणारा हा समुद्रकिनारा, कासवांसाठीचा जगातील सर्वात जास्त प्रसिद्ध असा समुद्रकिनारा आहे.

व्यवस्थापक, भारतीय पर्यटन, भुवनेश्वर

कसे पोहोचाल?

भितरकनिका राष्ट्रीय उद्यानात पोहोचण्यासाठी उत्तरेकडून चांदबली (भद्रक पासून ६० किलो मीटर आणि भुवनेश्वरपासून १९० किलो मीटर) तर दक्षिणेकडून राजनगरहून (केंद्रापारा पासून ७२किलो मीटर आणि भुवनेश्वरपासून १६० किलो मीटर) पाटमुंडई, कटक आणि भुवनेश्वर मार्गे प्रवास करावा लागतो. भुवनेश्वर हा सर्वात जवळचा विमानतळ आहे. हे विमानतळ पाटमुंडई-राजनगरमार्गे १६० किलो मीटरवर तर चांदबली-भद्रक मार्गे २२४ किलो मीटरवर आहे. भद्रक (भितरकनिकाहून चांदबली मार्गे ९०किलो मीटर) हे पूर्व किनारी रेल्वेमार्गावरील सर्वात जवळचे रेल्वे स्थानक आहे. रस्तेमार्गाने पोहोचण्यासाठी चांदबलीमार्गे (भितरकनिकापासून ३० किलो मीटरवर) मुख्य रस्ता आहे तसेच बालासोर, भद्रक, भुवनेश्वर, कटक आणि कोलकाताहून सुद्धा येथे पोहोचण्यासाठी चांगले रस्ते आहेत.

भेट देण्याचा सर्वोत्तम काळ

ऑक्टोबर ते मार्च हा भितरकनिकाला भेट देण्याचा सर्वोत्तम काळ आहे. या काळात या जंगलातील जलक्षेत्रांभोवती वेगवेगळ्या प्रजातींच्या पक्ष्यांचे थवे पाहायला मिळतात आणि पावसानंतर हिरवागार झालेला प्रसन्न निसर्ग मन मोहून घेतो. एकंदरीतच भितरकनिकाला भेट देणे हा एक नितांतसुंदर अनुभव आहे. येथील झुळझुळ वाहणाऱ्या नद्या, खारफुटीचे वैविध्य, अजस्र मगरी, रंगीबेरंगी पक्षी आणि रमणीय देखावे अनुभवताना कोणत्याही निसर्गप्रेमीचे भान नक्कीच हरपून जाईल.